**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय आरोग्य अभियानाला आणखी पाच वर्ष मुदतवाढ देण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

- महाराष्ट्रात ३ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यासाठी रिलायन्सचा राज्य सरकारसोबत सामंजस्य करार, ३ लाख रोजगार निर्माण होणार

- जळगाव जिल्ह्यात पाचोऱ्याजवळ रेल्वेनं चिरडल्यानं ११ जणांचा मृत्यू, १४ जण जखमी, राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या टी-ट्वेंटी सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाला आणखी पाच वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यावेळी देशातल्या आरोग्य सोयीसुविधांचा आढावा त्यांनी घेतला. गेल्या तीन वर्षांत, राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत माता आणि बाल आरोग्य, रोग निर्मूलन

आणि आरोग्यसेवा पायाभूत सुविधांसह अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

२०२५-२६ च्या हंगामासाठी कच्च्या तागाच्या किमान हमीभावात ६ टक्क्याची वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती पीयूष गोयल यांनी यावेळी दिली. तागाला ५ हजार ६५० प्रति क्विंटल इतका हमीभाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हा हमीभाव लागवड खर्चापेक्षा ६७ टक्के अधिक असून याचा लाभ ईशान्य भारतातल्या ४० लाख कुटुंबांना होणार असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बेटी बचाओ - बेटी पढाओ या अभियानाला आज दहा वर्षे पूर्ण झाली. या अभियानात सर्व वर्ग सहभागी झाले असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी समाजमाध्यमातल्या संदेशाद्वारे म्हणाले. या अभियानामुळे स्त्री आणि पुरुषातील लिंगभावभेद कमी झाला तसंच मुलींच्या शिक्षण आणि करिअरसाठी योग्य वातावरण तयार झालं असं प्रधानमंत्री म्हणाले. ज्या जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तर प्रमाण कमी होतं तिथेही बदल घडला, या अभियानामुळे स्त्री-पुरुष समानतेकडे लोकांचं लक्ष वेधलं गेलं असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. आपल्या मुलींच्या अधिकारांचं संरक्षण करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाचा भाग असलेल्या सुकन्या समृद्धी योजनेला देशात उत्तम प्रतिसाद मिळत असून, या योजनेत आतापर्यंत चार कोटीहून अधिक खाती उघडण्यात

आली आहेत. या योजनेत आठ पूर्णांक दोन दशांश टक्के व्याजदर दिला जातो.

**<><><><><>**

दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या गुंतवणूक परिषदेच्या दुसऱ्या दिवशी राज्यात आणखी ३ लाख ५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाला. रिलायन्स सोबत झालेल्या या करारातून ३ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यामुळं राज्यानं केलेल्या सामंजस्य करारांचं मूल्य ९ लाख ३० हजार कोटी रुपयांहून अधिक झालं आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

याशिवाय ह्युंदाई, डीपी वर्ल्ड, सिस्को, ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री टोनी ब्लेअर, NTT DATA या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी चर्चा केली. या कंपन्यांही राज्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत.

**<><><><><>**

जळगाव-पाचोरा दरम्यान परधाडे गावाजवळ आज झालेल्या रेल्वे अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १४ जण जखमी झाल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारनं ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचारांचा खर्च सरकार करणार आहे.

या मार्गावरुन मुंबईकडे चाललेल्या पुष्पक एक्सप्रेसच्या डब्याला आग लागल्याच्या अफवेनं जीव वाचवण्यासाठी प्रवाशांनी चेन खेचून गाडी थांबवली आणि डब्यातून खाली उतरले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसनं चिरडल्यानं हा अपघात झाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या उत्तर कन्नड जिल्ह्यात येल्लापूरजवळ झालेल्या रस्ता अपघातातल्या मृतांची संख्या आता १४ झाली आहे. आठवडी बाजाराकरता फळं आणि भाज्या वाहून नेणारा ट्रक सावनूरहून कुमठ्याला जात असताना दरीत कोसळून हा अपघात झाला. त्यात ९ जणांचा जागीच मृत्यू झाला तर जखमींपैकी ५जण रुग्णालयात उपचारादरम्यान मरण पावले. आणखी १५ जणांवर उपचार सुरु आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक प्रकट केला आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य प्रधानमंत्री राष्ट्रीय आपत्ती निधीतून जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

आम आदमी पक्ष दैनंदिन गरजांची पूर्ती करण्यात अपयशी ठरला असून दिल्लीत मद्य उपलब्ध आहे पण पिण्यासाठी पाणी नाही. अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्ताधारी आम आदमी पार्टीवर हल्लाबोल केला आहे. ते आज भाजपाच्या बुथ स्तरावरील कार्यकर्त्यांबरोबर नमो एप वरुन

संवाद साधताना बोलत होते. आप आणि काँग्रेस लोकांची दिशाभूल करत असून केजरीवाल यांनी त्यांच्या घरावर मोठा खर्च केला, मात्र आयुष्यमान योजना स्विकारली नाही. याकडे लक्ष वेधतानाच त्यांनी यमुना नदीचं प्रदूषण दूर करण्याचं आश्वासन आप ने दिलं पण ते पूर्ण केलं नाही, यावरुन जोरदार टीका केली. काँग्रेस नेते राहुल गांधी सदर बाजार इथल्या इंद्रलोक वसाहतीत जाहीर सभा घेतली. आप चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी विविध ठिकाणी सभा घेतल्या. भाजपाला सत्ता दिल्यास ते सर्व सवलती रद्द करतील, असं ते यावेळी म्हणाले. आपचे नेते आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दिल्लीत रोड शो केला.

**<><><><><>**

मथुरेतल्या वादग्रस्त मशिदीच्या सर्वेक्षणाला दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने पुढच्या सुनावणीपर्यंत म्हणजेच येत्या १ एप्रिलपर्यंत वाढवली आहे. मथुरेत श्री कृष्णजन्मभूमी – शाही ईदगाह मशिदीच्या वादासंदर्भात मथुरा न्यायालयातली प्रकरणं उच्च न्यायालयात वर्ग करण्याचा तसंच वादग्रस्त परिसराच्या परीक्षणासाठी विशेष आयुक्त नेमण्याचा आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला होता. मशीद कमिटीने त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं असून आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतल्या व्यापार शुल्काबाबतची अनिश्चिती कमी झाल्यानंतर गेले काही दिवस कोसळणारे भारतीय शेअर बाजार आज काहीसे सावरले. दिवसभरात

सेन्सेक्स आणि निफ्टीत चढ उतार राहिले. बाजार बंद होताना सेन्सेस्क्स ५६६ अंकानी वधारला आणि ७६ हजार ४०५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १३१ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार १५५ अंकांवर बंद झाला. दरम्यान, राष्ट्रीय शेअर बाजारातल्या नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ११ कोटींहून अधिक झाली आहे.

**<><><><><>**

निवडणूक काळात उत्तम कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्राला पुरस्कार जाहीर केला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२४-२५ या वर्षासाठी महाराष्ट्रासोबत जम्मू आणि काश्मिर तसंच झारखंडलाही पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय मुंबई शहरचे जिल्हाधिकारी संजय यादव आणि मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांना विशेष श्रेणीत पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी, राष्ट्रीय मतदार दिनी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

राज्यस्तरीय पातळीवरही लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या पाच सामन्यांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. कोलकात्यात ईडन गार्डन मैदानावर सुरु असलेल्या या

सामन्यात शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंग्लंडच्या १४ व्या षटकात ६ बाद ९७ धावा झाल्या होत्या.

सामन्यातल्या तिसऱ्याच चेंडूवर अर्शदीप सिंगनं फिल सॉल्टला शून्यावर तंबूत धाडलं. तर तिसऱ्या षटकात त्यानं बेन डकेटला ४ धावांवर बाद केलं. त्यानंतर कर्णधार जोस बटलरनं इंग्लंडचा डाव सावरला.

भारतीय संघाचं नेतृत्व सूर्यकुमार यादव करत आहे.

**//<><><><><>//**